**प्रेसनोट दि.२२.०८.२०२२**

**पिंपरी चिंचवड आयुक्तालय पोलीसांनी राबविले कोंबींग ऑपरेशन व नाकाबंदी राबवले बाबत.**

मा.पोलीस आयुक्त श्री. अंकुश शिंदे, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय यांनी पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये सर्व पोलीस ठाणे, चौकी व शाखा प्रभारी अधिकारी यांना आदेश देवुन मालमत्तेविरुध्दचे व शरिराविरुदधचे संभाव्य गुन्ह्यांचा अटकाव करणेचे अनुषंगाने उपाययोजना म्हणुन संपुर्ण पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयचे कार्यक्षेत्रातील सर्व पोलीस स्टेशन व चौकी हद्दीत दिनांक-२२/०८/२०२२ रोजीचे रात्री २४:०० ते दिनांक २३.०८.२०२२ रोजीचे पहाटे ०३:०० वा. पर्यंत कोंबींग ऑपरेशन व नाकाबंदी**चे आयोजन करुन कारवाई करणेबाबत आदेश दिले होते.**

कोंबींग ऑपरेशन व नाकाबंदी_दरम्यान मिळुन आलेले आरोपी अथवा_संशयितावर गुन्हे दाखल करणेसाठी पो.स्टे स्तरावर तपास पथके तयार करुन अभिलेखावर उपलब्ध मोक्का मधील, खून, दरोडा, जबरी चोरी यामधील निष्पन्न परंतू अटक नसलेले आरोपी,, पाहीजे,फरारी आरोपी यांचा शोध घेणे तसेच तडीपार गुन्हेगारांचे निवास स्थान चेक करुन तो तडीपारकालावधीत आपले पोलीस ठाणे हद्दीत येतो किंवा नाही याची खात्री करणे, पोलीस स्टेशन हद्दीतील टॉप २५ गुन्हेगारांची यादी मधील सर्व गुन्हेगारांचे निवासस्थान तपासणे,तुरुंगातुन/पॅरोलवर सुटलेले सर्व गंभीर गुन्ह्यातील आरोपी यांना तपासतील व त्यांच्य हालचालीवर लक्ष ठेवतील, अभिलेखावरील बेलेबल,नॉन बेलेबल,पोटगी वॉरंट मधील सर्व आरोपींचा शोध घेवुन वॉरंटची बजावणी करणे.पोलीस ठाणे हद्दीत राहणारे सर्व हिस्ट्रीशिटर यांना तपासणे इत्यादी प्रकारे कारवाई करणेबाबत सुचना दिल्या होत्या.

सुचने प्रमाणे कोंबींग ऑपरेशन व नाकाबंदी करीता पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत सर्व पोलीस स्टेशन व गुन्हे शाखेसह एकुण ५ सहायक पोलीस आयुक्त, २६ पोलीस निरीक्षक, ५५ सहायक पोलीस निरीक्षक/ पोलीस उपनिरीक्षक, ४९६ अंमलदार यांची पथके तयार करुन संपुर्ण पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात कोंबींग ऑपरेशन व नाकाबंदी करीता पोलीस अधिकारी व अंमलदार नेमण्यात आले होते. कोंबींग ऑपरेशन व नाकाबंदी दरम्यान पोलीस स्टेशन व चौकी व गुन्हे शाखा यांनी रेकॉर्डवरिल ३९० आरोपीना चेक करण्यात आले असुन सी.आर.पी.सी १०७ प्रमाणे ०५ ,१०९ प्रमाणे-०२ व ११० प्रमाणे-०१ कारवाई ,बी.पी.एक्ट १२२ प्रमाणे ०४, कारवाई तर आर्म एक्ट प्रमाणे ०१, पाहिजे आरोपी एकुण २१ अटक तर फरारी आरोपी ०५ अटक करण्यात आलेले आहे तसेच एकुण ९७४ वाहने चेक करुन एम.व्ही.ॲक्ट प्रमाणे ८१ वाहनांवर ५१,३२५/- दंड आकारण्यात आला तसेच नॉन बेलेबल -०६ वॉरंट बजवाले तर बेलेबल ०४ वॉरंट बजवाले आहे.

सदर ची कामगीरी ही मा.पोलीस आयुक्त श्री. अंकुश शिंदे, मा. अपर पोलीस आयुक्त श्री. डॉ. संजय शिंदे, मा. पोलीस उप-आयुक्त परिमंडळ-१ श्री.मंचक इप्पर,मा. पोलीस उप-आयुक्त, गुन्हे श्री. डॉ.काकासाहेब डोळे,मा. पोलीस उप-आयुक्त परिमंडळ-०२ श्री. आनंद भोईटे यांचे मार्गदर्शनाखाली सर्व पोलीस स्टेशन , चौकी व गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी केली आहे.

Scanned with CamScanner